# ई - पोलीस पत्रिका

दि. २३/०७/२०२४ अनु.क्र.१३२

## (अमरावती शहर पोलीसांची२०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

### रजा

**०१.पोआअ/आस्था-५/प्रसुती रजा/६५२४/२०२४ अमरावती शहर दिनांक १९/०७/२०२४**

### आदेश

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय प्रमाणपत्राचे आधारे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ७४ तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अरजा-१४०९/प्र.क्रं.८/०९/सेवा-६, दिनांक २४/८/२००९ व दि.१५/१/२०१६ चे तरतुदीनुसार १८० दिवस प्रसुती रजा, रजा वेतनासह प्रसुतीच्या संभाव्य तारखेपासुन अथवा प्रसुतीकरीता रजेवर सुटल्याचे तारखेपासुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम/ब.नं./नाव | नेमणुक | नियुक्ती दिनांक | प्रसुतीची वेळ | प्रसुतीची संभाव्य तारीख | अपत्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/५५८, सोनाली मोकळकर (कडु) | पोलीस मुख्यालय | दि.२९/१०/२०१४ | पहिली | दि.०५/०८/२०२४ | - |
| २ | मपोशि/५४७, रिना रुद्राकर (ढेंगेकर) | पो.स्टे. राजापेठ | दि.१५/०२/२०१५ | दुसरी | दि.११/०९/२०२४ | १ |
| ३ | मपोशि/१८९, कांचन सपकाळ (चव्हाण) | अमावाप्रक | दि.१६/०१/२०१९ | पहिली | दि.१४/१०/२०२४ | - |
| ४ | मपोशि/१५८७, अश्विनी नांदुरकर | कोतवाली | दि.२०/११/२००८ | दुसरी | दि.१९/०८/२०२४ | १ |

वरिल नमुद महिला पोलीस अंमलदार यांना रजेवर सोडल्याचा व हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावा.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

### शिक्षा

**१.पोआअ/विचौ/निलंबन कालावधी/दिवंगत पोहवा-६२५ दंडारे/६११४/२०२४ अमरावती शहर दि.०४/०७/२०२४**

**संदर्भ :-** १) या कार्यालयाचे निलंबन आदेश क्रमांक पोआअश/विचौ/निलंबन/पोहवा-६२५ पांडूरंग दंडारे/

६७९६/२०२३, दिनांक १३/०६/२०२३

२) या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोआअ/आस्था-१/मयत पोहवा-दंडारे/५३१९/२०२४, दिनांक ०५/०६/२०२४

**विषय** :- अपचा-यांचा मृत्यु झाल्याने विभागीय चौकशी संपुष्टात आणून व निलंबन कालावधी निश्चिती बाबत.

## आदेश

उपरोक्त संदर्भान्कीत विषयान्वये दिवंगत पोहवा/६२५ पांडुरंग नारायण दंडारे, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर हे कर्तव्यावर अनधिकृतपणे गैरहजर राहिल्याने बेशिस्त वर्तनाचे कसुरीवरुन संदर्भीय क्रमांक ०१ नुसार सेवेतुन निलंबित करण्यात आलेले होते. तसेच विभागीय चौकशी सुरु असतांना व निलंबित असतांना त्यांचा आजाराने उपचारा दरम्यान दिनांक १२/०५/२०२४ रोजी मृत्यु झाला असल्याने महानगर पालिका, अमरावती यांनी निर्गमित केलेल्या मृत्यु प्रमाणपत्राचे आधारे नमुद पोलीस अंमलदार यांचे नाव या आस्थापनेवरुन संदर्भीय क्रमांक ०२ नुसार दिनांक १३/०५/२०२४ चे माध्यान्हापुर्व पासुन कमी करण्यात आले आहे.

तसेच महाराट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम १३ (चार), शासन अधिसुचना सामान्य प्रशासन विभाग क्र.सीडीआर ११९९/प्र.क्र.१३/९९/११, दिनांक २३/०२/२००० आणि शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.वशिअ-१२१८/प्र.क्र.६१/११, दिनांक ३१/०५/२०१८ च्या तरतुदीनुसार अपचारी शासकीय कर्मचा-याच्या मृत्युनंतर शिस्तभंग कारवाई तात्काळ संपुष्टात येते.त्यामुळेदिवंगत पोहवा/६२५ पांडूरंग नारायण दंडारे यांचा मृत्यु झाला असल्याने त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी संपुष्टात आणण्यात येत आहे.

तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे व प्रदाने) नियम १९८१ मधील ७२ (२) तरतुदीनुसारदिवंगत पोहवा/६२५ पांडूरंग नारायण दंडारे यांचा दिनांक १३/०६/२०२३ पासुन ते दिनांक १२/०५/२०२४ पावेतोचा निलंबन कालावधी हा **सर्व प्रयोजनार्थ कर्तव्यकाळ** म्हणुन गणण्यात येत आहे. ते निलंबित झाले नसते तर त्या कालावधीत जेवढे वेतन व भत्ते मिळण्याचा त्यांना हक्क असता तेवढे पूर्ण वेतन व भत्ते त्यांच्या कुटूंबाला देण्यात येईल. मात्र त्यांना देण्यात आलेली निवार्ह भत्त्याची रक्कम त्यातुन समायोजित करण्यात येईल.

**२.पोआअ/वि.चौ-१/निलंबन मुक्त/व.श्रे.लि.कुरवाळे/६३७५/२०२४ अम.शहर, दिनांक १२/०७/२०२४**

संदर्भ :- या कार्यालयाचे आदेश क्र. पोआअश/प्र.लि./निलंबन/व.श्रे.लि.-नामदेव कुरवाळे/४९८०/२०२४ दिनांक २४/०५/२०२४

## निलंबन मुक्त आदेश

श्री नामदेव गोपाळराव कुरवाळे, वरिष्ठ श्रेणी लिपीक यांना दिनांक २४/०५/२०२४ तारखेपासुन संदर्भीय आदेश दिनांक २४/०५/२०२४ अन्वये शासन सेवेतुन निलंबित करण्यात आले होते. सदर वरिष्ठ श्रेणी लिपीकचे निलंबन प्रकरणाचे आम्ही पुर्नविलोकन करुन त्यांना कर्तव्यावर हजर झाल्याच्या दिनांकापासुन निलंबनातुन मुक्त करण्यांत येवून सेवेत पुन:स्थापित करण्यात येत आहे. त्यांना निलंबनातुन मुक्त केल्यानंतर त्यांची नेमणुक त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे करण्यात येत आहे.

खालील नमुद वरिष्ठ श्रेणी लिपीक यांचे कसुरीबाबत प्राथमिक चौकशी पुर्ण झाल्याने त्यांची निलंबनातुन मुक्तता करण्यात आलेली असून मुक्तता ही पुर्णत: तात्पुरत्या स्वरुपाची असुन त्यांचे कसुरीचे शिक्षेबाबत व निलंबन कालावधी ठरविण्याबाबतचे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येईल.

| अ. क्र | निलंबित कर्मचारी यांचे नांव | नेमणुक ठिकाण | निलंबन तारीख | निलंबनातील मुख्यालय | निलंबनातुन मुक्त केल्यानंतर नेणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री नामदेव गोपाळराव कुरवाळे, वरिष्ठ श्रेणी लिपीक | अर्ज शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर | २४/०५/२०२४ | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर | अर्ज शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर |

**भाग-३**

**वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण**

## संकीर्ण

**१.पोआअ/लेखा/पोकनि-वैद्यकीय अग्रीम/६५४०/२०२४ अमरावती शहर दि.१९/०७/२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवरील खालील नमूद मंत्रायलीनकर्मचारी यांना त्यांचे मागणी अर्जानुसार **विशेष बाब** म्हणुन वैद्यकीय अग्रीम **महाराष्ट्र पोलीसकल्याण निधी नियमावली - २०२३ मधील नियम ९ (२) (ब) तरीतुदी नुसार** खालील प्रमाणे मंजुरकरण्यात येत आहे.

श्री.नामदेव कुरवाडे, वरिष्ठश्रेणी लिपीकयांच्याकडे यापूर्वी दिलेल्या पोलीसकल्याण वैद्यकीय कर्जाचीखालील प्रमाणे वसूली प्रलंबित आहे.

१) माहे सप्टेंबर -२०२३ मध्ये मुलगा आजारी असल्याने रुपये ४०,०००/- वैद्यकीय अग्रीम देण्यात आलेहोते. त्या कर्जामधील रुपये ३०००/- X ४ हप्ते असे एकुण रुपये १२,०००/- प्रलंबित आहे.
२) दि.०३.०६.२०२४ रोजी मुलगा आजारी असल्याने रुपये २५,०००/- वैद्यकीय अग्रीम देण्यात आलेहोते. त्या कर्जामधील रुपये २५,०००/- चेसंपूर्णहप्ते प्रलंबित आहे.
३) तसेच दि.१८.०७.२०२४ रोजी पत्नीच्या आजाराचे कारणास्तव रुपये १५,०००/- वैद्यकीय अग्रीम मंजुरकरण्यात आले आहे.

| अ. क्र | अधिकारीकर्मचारी यांचे नाव व पदनाम | कर्ज मागण्याचेकारण | मंजुर व प्रलंबित कर्जाचे विवरण | वसुल करावयाची प्रती महा रक्कम व हप्त्यांची संख्या | वसुली सुरु करावयाचा महीणा |
|---|---|---|---|---|---|

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. नामदेव कुरवाडे, वरिष्ठश्रेणी लिपीक कार्यरत अर्ज शाखा पोलीस आयुक्तकार्यालय अमरावती | मुलाच्या व पत्नीच्या औषध उपचाराकरिता (डॉक्टरांचे प्रमाणपत्र सादरकेले आहे.) | १)१२,०००/-<br>२)२५,०००/-<br>३)१५,०००/-<br>**एकुण= ५२,०००/-** | **रुपये ३२५०/- प्रमाणे १६ हप्त्यामध्ये** | जुलै - २०२४ |

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,
पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस